
Review of ReseaRch
ISSN: 2249-894X
Impact Factor : 5.7631(UIF)
Volume - 15 | Issue - 1 | OctOber - 2025

# मराठा समाजविषयक डॉ.आ.ह.साळुंखे यांचे चिंतन

**डॉ.ए.बी.जाधव**
**राज्यशास्त्र विभाग,शहाजीराजे महाविद्यालय,**
**खटाव, जि.सातारा.**



बॅरिस्टर अंतुले हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यानंतर 'सत्ता गेली हीच मराठा समाजाला सुवर्णसंधी' हा डॉ.आ.ह.साळुंखे यांचा लेख किर्लोस्करच्या जून १९८१ च्या अंकात प्रसिद्ध झाला. या लेखाने मराठा समाजाविषयी बहुआयामी चिंतन मांडले. या लेखाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मराठा समाजातील समस्यांवर नेमकेपणाने बोट ठेवण्याचे कार्य डॉ.आ.ह.साळुंखे यांच्या लेखणीने केले. डॉ.आ.ह.साळुंखे यांच्या लेखनात व्यवस्था परिवर्तनाचे उद्दिष्ट समोर ठेवून त्यासाठी आवश्यक असणारी रचना आणि त्याचे प्रकटीकरण दिसते. सर्वसामान्य माणसांचा स्वतःच्या जीवनाकडे पाहण्याचा निकोप दृष्टिकोन जागृत करणे, गुलामगिरीची दडपने नष्ट करून त्यांच्यात स्वातंत्र्याचा मुक्त श्वास घेण्याची जाणीव करून देणे, हे त्यांच्या लेखनाचे सामर्थ्य आहे. डॉ.आ.ह.साळुंखे यांची लेखणी स्वातंत्र्य, समता, न्याय, विश्वबंधुत्व या मानवी मूल्यांचा पुरस्कार करते. मराठा समाजाविषयी डॉ.आ.ह. साळुंखे यांनी वेळोवेळी आपले मत मांडले आहे. फुले, शाहू, आंबेडकर या आधुनिक महामानवांचा आदर्श घेऊन मराठा समाजाने वाटचाल केली पाहिजे, हे डॉ.आ.ह.साळुंखे वारंवार आपल्या लेखणीतून मांडत असतात.

## वैचारिक भूमिका:

मराठा समाजाच्या चळवळीला वैचारिक अधिष्ठान देण्याची भूमिका डॉ.आ.ह.साळुंखे यांनी पार पाडली. मराठा समाजाच्या चळवळीतील सर्वच विचारांचे समर्थन त्यांनी केले नाही. मराठा समाजासंदर्भात किर्लोस्कर मासिकामध्ये लिहिलेल्या लेखात त्यांच्या भूमिका आजही लागू होताना दिसते. त्यांच्या मते, 'आपली संख्या गावामध्ये अधिक असल्यामुळे इतर जातीच्या लोकांशी अरेरावीने

वागणे हा मराठ्यांचा एक अंतर्गत गुणधर्म बनला आहे. वस्तुतः आपल्याकडे समाजाचे नेतृत्व आलेले असेल तर आपण ३५ टक्के असू आणि इतर जाती ५ टक्के, ७ टक्के वा १३ टक्के असतील परंतु त्या सर्वांच्या पाठबळावरच आपण उभे आहोत, हे आपण विसरता कामा नये. आजपर्यंत इतरांनी आपली अरेरावी सहन केली असेल, येथून पुढे ती सहन केली जाणार नाही, आणि केली जाऊ नये! पाच-सात टक्के असलेले सर्व लोक एकत्र येऊन ६५ टक्के झाले तर एरवी बहुसंख्य वाटणारे ३५ टक्के मराठेही अल्पसंख्य होतील, हे कोणी विसरू नये. तसे होण्याची शक्यता आहे. याची चाहूल आत्ता लागलेली आहे. तेव्हा अजून तरी आपल्या मराठेपणाची धार इतरांना बोचणार नाही याची आपण खबरदारी घेतली पाहिजे'.(साळुंखे,(२०११),७४) महाराष्ट्राच्या राजकारणात आणि समाजकारणात मराठा समाज मोठ्या प्रमाणात आहे. अगदी गावपातळीपासून देशपातळीपर्यंत सत्तेमध्ये अनेक वर्षापासून मराठा समाज असलेला दिसून येतो. भारताच्या कोणत्याही राज्यात एका जातीची लोकसंख्या एवढ्या मोठ्या प्रमाणात असणारा दुसरा समाज नाही. इतर समाज एकत्र आले तर महाराष्ट्रातील मराठ्यांची सत्ता जाऊ शकते. तेव्हा त्यांनी संयम ठेवावा. काही घटक जाती-जातीमध्ये द्वेषही निर्माण करत असताना डॉ.आ.ह.साळुंखे मात्र समन्वयाची भूमिका सोडत नाहीत.

## सामाजिक परिस्थिती :

मराठा समाजाच्या सामाजिक परिस्थितीचा विचार करताना डॉ.आ.ह.साळुंखे म्हणतात, 'मराठा समाज हा लढवय्या आहे. ज्या काळात लढणाऱ्या लोकांना क्षत्रिय मानले जात होते त्या काळातही त्यांची स्थिती दुय्यम होती. उदाहरणार्थ, यज्ञामध्ये त्यांना सोमरस पिण्याचा अधिकार नव्हता. तर वडाच्या किंवा पिंपळाच्या डिऱ्यांचा रस घ्यावा लागे. तिन्ही द्विजवर्णांच्या उपनयनातही प्रचंड भेद ठेवण्यात आले होते. मध्ययुगात देखील हीच परिस्थिती राहिली. तुकाराम महाराज आर्थिकदृष्ट्या समृद्ध असलेल्या सावकाराचा मुलगा होता. मात्र तो जेव्हा लिहायला लागला, तेव्हा त्याची गाथा बुडविली गेली, का? तर ते शूद्र आहेत म्हणून! छत्रपती शिवाजी महाराज आर्थिकदृष्ट्या समृद्ध होते. त्यांनी राज्य निर्माण केले होते. मात्र त्यांना देखील शूद्र मानून त्यांच्या राज्याभिषेकाला विरोध करण्यात आला. कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांच्या बाबतीत तेच झाले. अशी कितीतरी उदाहरणे सांगता येतील. यातून हेच दिसून येते की, हे सामाजिकदृष्ट्या मागासलेली आहेत'.(डक,(२०१९), विचारग्रंथ, ५४६) याचप्रमाणे प्रतापशिंह महाराज आणि बडोदा संस्थांनचे राजे सायाजीराव गायकवाड यांनाही वेदोक्ताची झळ बसली. मराठ्यांचे मागासलेपण मोजताना इतरांशी तुलना करून त्यांना वाईट अवस्थेत जगाव लागलं. मराठ्यांना अस्पृश्यतेचे चटके बसले नाहीत हे खरे आहे. परंतु त्यांना एका विशिष्ट वर्गाकडून अतिशय वाईट जीवन जगावे लागले. आज मराठा समाजात शेती आणि शेतमजुरी करणाऱ्या कुटुंबांची संख्या अधिक आहे. मराठा कुटुंबांची पक्की घरे असणाऱ्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. गावाबाहेर, शेतात, वस्तीवर राहण्याचे प्रमाण मोठे आहे. त्यांची सामाजिक

स्थिती खालावलेली दिसून येते. ज्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. त्यामध्ये मराठा समाजाच्या शेतकऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. सामाजिक आणि शैक्षणिक स्थिती चांगली नसल्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती खालावलेली आहे. यातूनच या आत्महत्या होतात. जुन्या चालीरीती, रुढी, परंपरा पाहणाऱ्यांचे प्रमाण मराठा समाजात जास्त आहे.

**स्त्रियांची परिस्थिती :**

मराठा समाजाच्या स्त्रियांचे शिक्षणातील प्रमाण अत्यल्प आहे. आजही मराठा समाजातील स्त्रिया 'चूल आणि मूल' या संकल्पनेच्या बाहेर निघालेल्या नाहीत. आजही स्त्रियांना कनिष्ठ दर्जा दिला जातो. निर्णय प्रक्रियेत समाविष्ट करून घेतले जात नाही. किर्लोस्कर मासिकामध्ये लिहिलेल्या लेखात ते म्हणतात, 'अजूनही स्त्रियांच्या बाबतीत कमालीचा पक्षपातीपणा केला जातो. शिक्षणाच्या बाबतीत त्यांना दुय्यम लेखले जाते. दारामध्ये गाई, म्हशी झुलत असल्या तरी सुनेला दुधाचा थेंब न देणारी कुटुंबे माझ्या पाहण्यात आहेत. स्वतःला सुशिक्षित व पुरोगामी समजणारे लोकही मुलाचे बारसे साजरे करण्यासाठी हजारो रुपये खर्च करतात परंतु मुलगी झाली की कपाळाला आठ्या पडतात, हे मी पाहिले आहे'.(साळुंखे,(२०११),७२) डॉ.आ.ह.साळुंखे म्हणतात, जोपर्यंत मराठा स्त्री असह्य अवस्थेत खितपत पडलेली आहे, तोपर्यंत मराठा समाज खऱ्या अर्थाने आधुनिक युगात प्रवेश करणार नाही. आज आधुनिक व विज्ञाननिष्ठ शिक्षण मराठा स्त्रीला देणे ही आजची गरज आहे. स्त्रिया या संस्कृतीच्या वाहक आहेत. बहुसंख्य शेतकरी वर्गाच्या सामाजिक मागासलेपणात स्त्रियांचे मागासलेपण गंभीर आहे.

**कर्मकांड :**

हिंदू धर्मात श्रद्धा, विश्वास, यांना महत्त्वाचे स्थान आहे. मराठा जातीत प्रथा, परंपरा, विश्वास, कर्मकांड यांनी समाज व्यापून निघालेला आहे. डॉ.आ.ह.साळुंखे म्हणतात, 'मराठा समाजामध्ये सध्या मोठ्या प्रमाणावर कर्मकांडावर भर देण्यात येत आहे. पैसा असो की नसो, मोठाले वाढदिवस करणे, लग्नामध्ये भरमसाठ पैसा खर्च करणे, गृहप्रवेशासाठी अनावश्यक खर्च करणे, यातून मोठ्या प्रमाणावर संपत्तीची उधळण होत आहे. हे करत असताना आपली ऐपत तरी असते काय, हा वायफळ खर्च न करता हाच पैसा आपल्या मुला-मुलींच्या नावावर टाका, पुढे त्यांच्या शिक्षणासाठी तो तुमच्या कामाला येईल. तसेच फसव्या कर्मकांडापासून दूर राहण्याबाबतचा सल्लादेखील डॉ.आ.ह.साळुंखे देतात. धार्मिक श्रद्धा म्हणून, भावना म्हणून काही मोजके विधी करण्यास हरकत नाही. मात्र खोट्यानाट्या थापावर विसंबून वेळ, श्रम, पैसा वाया घालवू नका. समाजात प्रतिष्ठेसाठी सावकाराकडून पैसे घेणे व आयुष्यभर तो पैसा भेटत राहणे यात काय मोठेपण आहे? अशा खोट्या प्रतिष्ठेच्या मागे लागू नका'.(डक,(२०१९),५५१) डॉ.आ.ह.साळुंखे म्हणतात, अंधश्रद्धा नाकारल्या पाहिजेत, तशा नव्या वाटा

शोधल्या पाहिजेत. समाजाने काळानुरूप बदलले पाहिजे. योग्य त्या विधायक गोष्टी केल्या पाहिजे. यासाठी डॉ.आ.ह.साळुंखे वारंवार भाषण करताना दिसतात. त्यांच्या म्हणण्याला मराठा समाजातूनही सकारात्मक प्रतिसाद देखील आहे.

## शिकलो, पण ज्ञान कुठे आहे?

मराठा समाजातील राजकारणाच्या आकर्षणामुळे सर्वांगीण विकासावर अनेक मर्यादा पडल्या. सत्ता गेल्यावर तरी मराठा समाजाला शिक्षणाचे महत्त्व समजेल असे डॉ.आ.ह.साळुंखे यांचे मत होते. राजकारणामुळे शिक्षण पद्धती कशी खालावलेली आहे हे सांगताना शिकलो पण ज्ञान कोठे आहे? असा प्रश्न समाजाला विचारला होता. 'आपल्या शिकलेल्या लोकांच्या एकूण गुणवत्तेचं ऑडिट आपणच केलं पाहिजे. आता नुसतं शिकवलं एवढं म्हणणं देखील पुरेसं नाही. आपली मुलं दर्जेदार शिक्षण घेतात की नाही, हे पाहणं पण आवश्यक आहे. मी तर असं म्हणेन की खरोखर आपल्या शिकलेल्या लोकांच्या एकूण गुणवत्तेचे ऑडिट आपलं आपणच केलं पाहिजे. चांगले ज्ञान जर मिळालं नसेल तर काय उपयोग? मुलांनी आपल्या मनातील जिज्ञासा सदैव जिवंत आणि ताजी ठेवली पाहिजे. कष्ट केले पाहिजे. आपला विषय नीट समजावून घेतला पाहिजे. त्यातील बारीक-सारीक मुद्द्यांचे तपशीलवार आणि खोलात जाऊन आकलन केलं पाहिजे. आपल्यासमोर जे काही येईल ते आंधळेपणाने मुकाट्यानं न स्वीकारता प्रत्येक गोष्ट चिकित्सकपणान तपासल्यानंतरच ती स्वीकारायची की नाही ते ठरवलं पाहिजे. थोडक्यात म्हणजे आपली बुद्धी वापरली पाहिजे. निसर्गानं प्रत्येकाला स्वतंत्र मेंदू दिला आहे. तो प्रत्येकाने स्वतंत्रपणानच वापरला पाहिजे. असं केलं तर माणूस स्वतःही बौद्धिक गुलामगिरीत अडकत नाही आणि आपल्या गुलामगिरीत अडकलेल्या भावंडांनाही स्वातंत्र्याचा आस्वाद देऊ शकतो. खरं शिक्षण हे या प्रकारचं असतं. शिक्षणातून स्वतंत्र बुद्धीचा माणूस तयार झाला पाहिजे आणि यासाठी मुलांनी व्यासंग केलाच पाहिजे. ज्ञानार्जन ही एक प्रकारची तपश्चर्या आहे. प्रत्येकाने ती केलीच पाहिजे'.(साळुंखे अमृत,(२०१७),२४,२५) मराठा समाज इतिहास, वर्तमान आणि भविष्य यावर विचार मांडताना यावर ते म्हणतात, मराठा समाजातील मुलांच्या शिक्षणाकडे आई-वडिलांनी लक्ष दिले पाहिजे. मराठा समाजातील तरुणाने पुढे जाऊन काही करायचे असेल तर उत्तम दर्जाचे शिक्षण आवश्यक आहे. कडाडून भूक लागली म्हणजे अन्न खाण्यासाठी किंवा खूप तहान लागली म्हणजे पाणी पिण्यासाठी आपण जसे तडफडतो तसे ज्ञान मिळवण्यासाठी पण आपण तडफडले पाहिजे. अशी अपेक्षा डॉ.आ.ह.साळुंखे यांनी व्यक्त केली.

## समारोप :

डॉ.आ.ह.साळुंखे हे शेतकरी आत्महत्यावर भाष्य करतात. यवतमाळ येथील नागरी सत्कार समारंभामध्ये त्यांनी शेतकऱ्यांच्या परिस्थितीबद्दल भाष्य केले. कर्जमाफी हा शब्द न वापरता कर्जफेड

असा शब्द वापरला तर खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या ऋृनातून मुक्त होवू असे भाष्य त्यांनी केले. त्यांच्या भाषणात शेती, आधुनिकीकरण आणि जगतिकीकरण यावर भाष्य केले. त्यांचा मुख्य रोख बहुसंख्य असणाऱ्या मराठा समाजाकडे होता. त्याचे प्रबोधन करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यांची आजपर्यंतची केलेली मांडणी नेहमी समाजातील सर्व घटकांना जोडणारी राहिलेली आहे. त्यांच्या या भूमिकेला आता मोठे यश येत असल्याचे आपणास दिसून येत आहे. आज सामाजिक मागासलेपणाची निश्चित अशी व्याख्या करता येत नाही. सामाजिक मागासलेपण वैज्ञानिक अंगाने, विवेकवादी अंगाने बघावे लागेल. मराठा जातीच्या स्त्रियांची परिस्थिती बघितली तर परंपरागत आहे. अंधश्रद्धा, कर्मकांड, वाईट रुढी, चालीरीती, परंपरा, जादूटोणा याकडे समाज लक्ष देताना दिसतो. सामाजिक, शैक्षणिक मागासलेपणा ठरवण्यासाठी आर्थिकबाबसुद्धा तितकीच गरजेची आहे. डॉ.अआ.ह.साळुंखे यांच्या मते, मराठ्यांचे मागासलेपण मोजताना दुसऱ्या घटकांशी तुलना करून चालणार नाही. इतर घटकांना अतिशय वाईट अवस्थेत जगाव लागलं. मराठ्यांना अस्पृश्यतेची चटके बसले  नाहीत हे खरे आहे. परंतु त्यांना एका विशिष्ट वर्गाकडून अतिशय वाईट जीवन जगावं लागलं. प्रत्यक्ष त्या समाजाची अवस्था बघून तसं ठरवलं पाहिजे. सामाजिक परिस्थितीबरोबर आर्थिक परिस्थिती देखील सुधारली पाहिजे. त्याच पद्धतीने आर्थिकदृष्ट्या जे मागासलेले आहेत त्यांची अवस्था केवीलवाणी व हलाखीची ठेवली तर त्यांचा सामाजिक दर्जा देखील खालावतो. हे लक्षात ठेवले पाहिजे. आज आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या लाखाच्या घरात गेली आहे. ही आत्महत्या आर्थिक परिस्थितीने होते. व त्याचे परिणाम आर्थिक जीवनावरच होतात असे नाही, सामाजिक जीवनावरही त्याचे परिणाम होत असतात.

## संदर्भ :

१. साळुंखे आ.ह., सत्ता गेली हीच मराठा समाजाला सुवर्णसंधी, मराठा समाज वास्तव आणि अपेक्षा, राजहंश प्रकाशन, पुणे, २०११.

२. डक कामाजी, डॉ. आ.ह.साळुंखे यांचे मराठा समाज इतिहास, वर्तमान आणि भविष्यावरील विचार, आ.ह.साळुंखे अमृतमहोत्सवानिमित्त विचारग्रंथ, शब्द शिवार प्रकाशन, मंगळवेढा, २०१९.

३. साळुंखे अमृत, मराठा समाज इतिहास, वर्तमान आणि भविष्य, लोकायत प्रकाशन, सातारा, २०१७.